# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१५/२०२३** **दिनांक १७/१०/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.१७/१०/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२५७७/२०२३, दि.१४.१०.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.१७/१०/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगडडा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा. श्री. सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. पी. शिवा शंकर, भा.प्र.से.,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.१** **दि.२५.०९.२०२३ रोजी अहमदनगर झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र. ६३७** **दि.२५.०९.२०२३ रोजी अहमदनगर झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **संस्थानचे विविध इमारतीवरील टेरेसवर रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी ५ वर्ष कालावधीकरीता Project Management Consultant & Transaction Advisor नियुक्त करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांमधील एल-१ निविदाधारकाशी वाटाघाटी/ चर्चेअंती निर्णय होऊन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६३८** **एल-१ निविदाधारक यांनी वाटाघाटीअंती २.२४ टक्के सर्व करांसहीत दर देऊ केले आहे. त्यानुसार प्रस्ताव मान्य. प्राथमिक अंदाजानुसार अंदाजे दहा कोटी पर्यंत प्रकल्पाचा खर्च येऊ शकतो व वरील दराने रु.२२.४० लाख पर्यंत सल्लागार यांची फी होऊ शकते ती रुपये ५० लाखाचे आत असल्यामुळे सध्या सी.ए. दाखल करण्याची आवश्यकता नाही.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.३** **श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या पवनचक्की यंत्रणेची निर्माण होणारी वीज ही संस्थानचे मंदिर परिसरातील नविन दर्शनलाईन कॉम्प्लेक्स मधील सबस्टेशनकरिता Captive Open Access द्वारे वापरणेकरिता स्पेशल एनर्जी मीटर बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी उघडणेत आलेल्या ई-निविदामधील एल-१ निविदाधारक मे. ओएसिस एनर्जी सोल्युशन एलएलपी, मुंबई यांनी इस्टीमेट रक्कमेपेक्षा (रु.४७,२०,०००/- सर्व करासहित) १५.३७५% कमी दिलेले दर रक्कम रु.३९,९४,३००/-मात्र (सर्व करासहित) स्विकारून त्यांना कार्यादेश देणेस तसेच त्याव्यतिरिक्त अर्ज प्रक्रिया शुल्क, चाचणी शुल्क, सदर कामासाठी लागणारे अन्य सरकारी/वैधानिक शुल्क यासह सर्व अधिकृत शुल्क संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६३९** **प्रस्ताव मंजूर. निम्नतम निविदाधारकाकडून नियमानुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

विषय नं.४ श्री साईबाबा संस्थानमार्फत उभारण्यात आलेल्या नवीन दर्शनरांग इमारत व श्री साईबाबा शैक्षणिक संकुल इमारतीचे उद्घघाटन मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते करणेसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६४० सिक्युरीटी ऑडीट- सुरक्षा आढावा सुचनेप्रमाणे पुर्तता करणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली. नवीन दर्शनरांगसाठी आवश्यक मनुष्यबळ सध्या उपलब्ध मनुष्यबळाचे ठेकेदाराकडून सध्या घेता येईल अशी माहिती दिली. या पुर्वी सन २०१८ मध्ये या इमारतीचे व शैक्षणिक संकुल इमारतीचे भुमीपुजनाचे वेळेस १.४७ कोटी खर्च आलेला आहे. परंतु प्रस्तुत उद्घघाटन कार्यक्रम हा अन्य शासकीय कार्यक्रमासोबतच प्रस्तावीत असल्यामुळे यावेळेस उद्घघाटनाचा अनुषंगीक खर्च जो येणार आहे तो खर्च ४७.५० लाखापर्यंत असणार आहे, अशी माहिती दिली आहे. याप्रमाणे प्रस्ताव मंजूर. नवीन दर्शनरांग व शैक्षणिक संकुलाचे मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचे हस्ते दि.२६.१०.२०२३ चे नियोजीत दौ-यामध्ये उद्घघाटन करुन घेण्यासाठी मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेणेकामी सी.ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.५ श्री. राजेंद्र काशिनाथ चाफे, कायम सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.६४१ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.६ श्री.दशरथ भगवंत चासकर, संस्थान कुशल कंत्राटी कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.६४२ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.७ श्री पुण्यतिथी उत्सव-२०२३ मधील श्रींच्या फोटो व पोथीच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, फोटो तसेच पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमासाठी मान्यवरांची नावे निश्चित होणेबाबत.

निर्णय क्र.६४३ श्री पुण्यतिथी उत्सव-२०२३ मधील श्रींच्या फोटो व पोथीच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, फोटो तसेच पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमासाठी खालील प्रमाणे मान्यवरांची नावे निश्चित करण्यात आली.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| प्रारंभ दिवस २३.१०.२०२३ सोमवार | पहाटे ०५.४५ वा. | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा-<br>पोथी- मा.जिल्हाधिकारी महोदय<br>प्रतिमा- १.<br>२. |
| | पहाटे ०६.०० वा. | अध्याय वाचन-<br>अध्याय क्र.१- मा.जिल्हाधिकारी महोदय<br>अध्याय क्र.२<br>अध्याय क्र.३<br>अध्याय क्र.४<br>अध्याय क्र.५ |
| | सकाळी ७.०० वा. | श्रींची पाद्यपुजा- मा.जिल्हाधिकारी महोदय |
| मुख्य दिवस २४.१०.२०२३ मंगळवार | पहाटे ०५.४५ वा. | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.जिल्हाधिकारी महोदय<br>पोथी- मा.अध्यक्ष महोदय<br>प्रतिमा- १.<br>२. |
| | सकाळी ७.०० वा. | श्रींची पाद्यपुजा- मा.अध्यक्ष महोदय |
| | सकाळी ९.०० वा. | भिक्षा झोळी कार्यक्रम- मा. तदर्थ समिती अध्यक्ष व सदस्य तसेच संस्थान अधिकारी इच्छेनुसार. |
| | सकाळी १०.३० वा. | आराधना विधी- मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती |
| तृतीय दिवस | सकाळी | श्रींची पाद्यपुजा |

| | | |
|---|---|---|
| २५.१०.२०२३<br>बुधवार | ०७.०० वा. | |
| सांगता दिवस<br>२६.१०.२०२३ | सकाळी<br>०६.५० | श्रींची पाद्यपुजा- |
| | सकाळी<br>०७.०० वा. | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक- मा.श्री.पी.शिवा शंकर, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा सदस्य, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती. |

उर्वरीत कार्यक्रमाचे सहभागा विषयी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चीती करावी.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.८ संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका-२०२४ छपाई करून पुरवठा करणेकामी राबविणेत येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त निम्नतम (-४०.३२) दराबाबत.

निर्णय क्र.६४४ प्रस्तुत विषयास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली असल्याने सदरचा विषय मागे घेण्यात आला. चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेला निर्णय वाचून कायम करणेसाठी आजचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं.१ म्हणून ठेवण्यात आलेला आहे.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

विषय नं.९ संस्थानचे मंदिर परिसर गेट नं. ४ लगत मोबाईल कॅमेरा क्लोकरूम चालविण्यास परवानगी मिळणेबाबत.

निर्णय क्र.६४५ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.१० संस्थानमार्फत साईभक्तांना वितरीत होणारी श्रीद्वारकामाई येथे निर्माण होणारी श्रींचे विभुतीचे पेटंट (स्वामित्व हक्क) साईभक्त श्री. केशमुर्ती यांचेमार्फत देणगीदाखल करून घेणेबाबत.

निर्णय क्र.६४६ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मंदिर विभाग)

---

विषय नं.११ www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर उपलब्ध करणेकामी M/s ESDS,Nashik यांना दिलेल्या कार्यादेशास मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.६४७ ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

विषय नं.१२ संगणक प्रि-प्रिटेंड छपाई करणे व याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६४८ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.१३ संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथील नविन शैक्षणीक संकुल इमारत परिसरात लॉन लावून परिसर सुशोभित करणेकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६४९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-बगीचा विभाग)

---

विषय नं.१४ शिर्डी शहरातुन जाणा-या अहमदनगर-कोपरगाव (NH-160) या राष्ट्रीय महामार्गावर साईभक्तांसाठी साईआश्रम, साईबाबा भक्तनिवासस्थान, शिर्डी बसस्थानक, नवीन दर्शनरांग इमारत ते श्री साई प्रसादालय या ठिकाणी स्कायवॉक उभारणेकामी सल्लागार नेमणूकीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन RFP (Request For Proposed) मागविणेबाबत.

निर्णय क्र.६५० तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.१५ श्री साईबाबा संस्थानमार्फत नव्याने लेजर शो (Light & Sound Show) प्रकल्प BOT (Build-Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन RFP (Request For Proposed) मागविणेबाबत.

निर्णय क्र.६५१ तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१६ नवीन श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीमध्ये श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत विविध प्रसंग तसेच बाबांच्या विविध मुद्रा कॅनव्हासवर चित्रीत करणे व लावणेसाठी मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६५२ याकामी नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागार यांनी संपुर्ण अभिप्राय दिल्यानंतर सदरचा विषय समितीपुढे सादर करण्यात यावा.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१७ श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरात श्री गणेश मंदिरालगत दक्षिण बाजूस श्री गोपाळकृष्ण मंदिर बांधणेबाबत.

निर्णय क्र.६५३ प्रस्ताव मंजूर. सी.ए. दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.१८ श्री साईबाबा संस्थान पाणी पुरवठा योजनेसाठी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५ मध्ये देणगीदारामार्फत उभारलेल्या साठवण तलावाचे मुल्यांकन करणे व त्याचा वापर सुरु करणेसाठी आवश्यक दुरुस्ती करणेबाबत.

निर्णय क्र.६५४ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

---

विषय नं.१९ वाढीव संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ चे योजनेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्ती रद्द करणेबाबत तसेच सुधारीत योजना तयार करणेसाठी संकल्पन, अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन या सेवा घेणेसाठी तज्ञ व अनुभवी सल्लागारांकडून ई-निविदा प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६५५ तहकुब. (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

विषय नं.२० मौजे शिर्डी, ता.राहाता येथील महाराष्ट्र शासन यांची सिटी सर्व्हे नं.९३ पै. क्षेत्र ९३.७ चौ. मिटर इतकी जागा ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना साईभक्तांचे सुविधेसाठी चप्पल स्टॅण्ड, लाडू काऊंटर व साईभक्तांना बसणेकामी सदर जागेवर बांधकाम करणेसाठी परवानगी मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६५६** तहकुब.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२१** श्री साईबाबा संस्थानच्या मुंबईस्थीत साईनिकेतन या इमारतीतील राहत असलेल्या भाडेकरु यांची भाडेवाढ करणेबाबत.

**निर्णय क्र.६५७** तहकुब. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२२** श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय व उर्वरीत इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणीकामी विद्यमान फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांची नेमणूक रद्द करुन नवीन फायर सल्लागार यांची नेमणूक करणेसाठी ई-आर.एफ.पी. प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६५८** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-फायर अॅन्ड सेफ्टी विभाग)

---

**विषय नं.२३** रुग्णवाहिका सेवा आकार दर वाढविणेबाबत.

**निर्णय क्र.६५९** मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०३.०७.२०२३ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या दरवाढीस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

**विषय नं.२४** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०२३-२४ करीता कार्यालयीन छपाई करणेकामीच्या पात्र ऑनलाईन कमर्शिअल ई-निविदेतील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत छपाई खरेदीकामी तातडीने कोटेशन मागविणे बाबत.

**निर्णय क्र.६६०** वाटाघाटीअंती +१० टक्केच्या आत असलेल्या एल-१ दराच्या निविदाधारकांना कार्यादेश देण्याची परवानगी देण्यात आली. उर्वरीत मटेरिअल करीता नवीन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यक तातडीचे छपाई काम सध्या आहे त्या छपाई दारांकडून करुन घेण्यात यावे.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.२५** **श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलकरीता नवीन Tablet खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६१** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२६** **संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत. (रु.९१,९०,०००/-)**

**निर्णय क्र.६६२** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२७** **विभागीय चौकशी अधिकारी यांचे नेमणुकीबाबत.**

**निर्णय क्र.६६३** **श्री.अशोक विठ्ठल शिंदे यांनी चौकशी केलेल्या प्रस्तावातील तीन प्रकरणासाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे विभागीय चौकशी अधिकारी नेमणुकीस मान्यता देण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२८** **दि.२० एप्रिल,२०२२ रोजीचे सुधारीत शासन निर्णयानुसार वाहतुक भत्ता (TA) मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६६४** **दि.२० एप्रिल,२०२२ रोजीचे सुधारीत शासन निर्णयानुसार वाहतुक भत्ता (TA) देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९** **संस्थानचे सर्व निवासस्थानामध्ये खोली देतेवेळी साईभक्तांकडून अनामत (डिपॉझिट) रक्कम घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६६५** **तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.३०** सन २०२४ या वर्षभरात येणा-या सण, उत्सवाकरीता मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेकामी येणा-या रु.३५,०४,०००/-खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६६६** तहकुब.

(कार्यवाही-बगीचा विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३१** श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य उचलणेकामी जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांना मुदतवाढ देणेबाबत.

**निर्णय क्र.६६७** माहिती अर्धवट दिलेली आहे, अपुरी आहे व मा.अध्यक्ष यांची दिशाभुल करणारी माहिती दिली आहे. म्हणून प्रस्ताव मंजूर करता येत नाही, असे मा.अध्यक्ष यांचे मत आहे.

या विषयाचे अनुषंगाने विश्वस्त समितीने यापुर्वी घेतलेले विविध ठराव यांचा अंतर्भाव करुन समितीसमोर पुन्हा प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बगीचा विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३२** माहे मार्च-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणे/कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६६८** तहकुब.

(कार्यवाही-लेखाशाखा)

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३३** माहे एप्रिल व मे-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणे/कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६६९** तहकुब.

(कार्यवाही- लेखाशाखा)

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३४** दि.०१.०७.२०२३ ते दि.३०.०९.२०२३ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरिता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.

**निर्णय क्र.६७०** दि.०१.०७.२०२३ ते दि.३०.०९.२०२३ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरिता प्राप्त झालेले अर्ज दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

-----------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.३५ श्री साई अभिषेक पुजा शुल्काची रक्कम पुर्णांकीत करणेस व श्री साईभक्तांनी श्रींना अर्पण केलेले रुमाल (सॅटीन) भक्तांना मोफत देणेबाबत.

निर्णय क्र.६७१ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.
आयत्या वेळेचा
विषय नं.१ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका-२०२४ छपाई करून पुरवठा करणेकामी राबविणेत येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त निम्नतम (-४०.३२) दराबाबत.

निर्णय क्र.६७२/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

२. मे.स्प्रिती प्रॉडक्टस् प्रा.लि. अंबाला यांचे व्हेंडर ऑडीटसाठी नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.६७२/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

३. मे.स्प्रिती प्रॉडक्टस् प्रा.लि. अंबाला यांना ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीत गाईचे शुध्द तूप पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.६७२/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **श्री साईबाबा नविन दर्शन काम्प्लेक्स येथील स्वच्छतेच्या कामांसाठी आऊटसोर्स टेंडर प्रक्रीया राबविणे आवश्यक असल्याने यापूर्वी या कामांसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं.७६९५/२०२३ नुसार मंजूर स्वच्छता साहित्य व मशिनरी मंदीर परिसर व साईबाबा भक्तनिवास परिसरात वापरास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६७३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) याचे सुरक्षा रक्षकांच्या वाढीव वेतनदराबाबत.**

**निर्णय क्र.६७४** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **संस्थानमध्ये ठेकेदारामार्फत कार्यरत लेबर व सिक्युरिटी कंत्राटी कर्मचा-यांना रजा व सुट्टया लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.६७५** **तहकुब.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील ई-निविदेत दर प्राप्त न झालेल्या On Consignment Basis Material, Suture, Ayurvedic व Dental Material करीता दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी प्राप्त निम्नतम दराने पुरवठा आदेश देणेस व उर्वरीत ज्या मटेरिअल करीता दर प्राप्त झालेले नाहीत त्याकरीता कोटेशन मागवून खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६७६** **तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६** **‘साईटेक प्रकल्प-२’ अंतर्गत मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त प्रस्तावीत अद्ययावतीकरण (संगणके व नेटवर्क) प्रस्तावास COPE,Pune यांचेमार्फत प्राप्त तांत्रिक मान्यतेनुसार याकामी खरेदी प्रक्रिया राबविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६७७ तहकुब.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचे संभाव्य शिर्डी दौरा प्रसंगी करावयाचे भोजन व्यवस्थेबाबत.**

**निर्णय क्र.६७८ सदरचे विषयाची चर्चा आजचे सभेतील नियमीत अजेंडयावरील विषय क्र.४, निर्णय क्र.६४० घेतांना केलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**वरील निर्णय क्र.६३७ ते ६७८ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ ८.१५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(पी.शिवा शंकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**